# मर्द को दर्द होता है!

'एवढंही जमत नसेल तर हातात बांगड्या भर', 'मर्द को दर्द नहीं होता', 'असली मर्द रोता नहीं है' किंवा मुलाला उद्देशून 'ए रडूबाई' ही आणि अशी वाक्यं आपण नेहमीच ऐकत आलोय. एवढंच नाही तर आपणही म्हटली असतील. पुरुष म्हणजे शक्तीमान, आक्रमक, रागीट, संरक्षक, भावनाहीन, भितीचा लवलेशही नसणारा असला पाहिजे अशी 'मर्दपणा'ची व्याख्या लहानपणापासूनच त्याच्यावर बिंबवली जाते. पुरुषांनी प्रेमळ, भावनिक असणं हे नेभळटपणाचं लक्षण मानलं जाते. पुरुष दणकटच असला पाहिजे आणि बाई रडूबाई. कुणी केली ही विभागणी? नैसर्गिक तर तसं नाहीये. निसर्ग विविधता बनवतो, भेद बनवतो पण भेदभाव नाही बनवत. म्हणजेच आपण केली ही असमान विभागणी. गेली हजारो वर्षं ह्या समाजात असलेल्या पितृसत्ताक व्यवस्थेने ही विभागणी केली आहे.

पितृसत्ताक पद्धत ही स्त्री-शोषणाची व्यवस्था आहे आणि पितृसत्ताकता आणि मर्दानगी याचा घनिष्ठ संबंध आहे. मर्दानगी पितृसत्ता पोसते. या व्यवस्थेत निर्णय घेण्याची आणि साधनसंपत्तीची मालकी पुरुषांकडे असते. या व्यवस्थेविरुद्ध गेली कित्येक वर्ष स्त्रिया लढत आहेत. गेल्या ३०-४० वर्षांमध्ये स्त्री चळवळीने पुरुषप्रधान व्यवस्थेविषयीचं भान सर्व समाजाला दिलं आहे. स्त्री स्वतः शोषित असल्यामुळे तिच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी विविध प्रकारे संघटित झाली. रस्त्यावर उतरून अत्याचारांविरोधात आंदोलनं, कायदेबदलांसाठी आंदोलनं, सामाजिक संस्था-संघटना बांधणी, जाणीव जागृती अशा अनेक मार्गांनी स्त्री-चळवळीने स्त्री-भान जागवण्याचा महत्त्वाचा टप्पा याआधीच पार केला आहे.

पितृसत्ता केवळ पुरुष राबवत नाहीत तर पुरुषांसाठी स्त्रियाही ती राबवतात. तेवढंच कटू सत्य असं आहे की पितृसत्तेच्या बळी केवळ स्त्रियाच नाहीत तर पुरुषही आहेत. स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वतःभोवती लैंगिक भूमिकांच्या काही चौकटी ठरवून घेतलेल्या आहेत. ठराविक भूमिकांचा हा तुरुंग फोडून बाहेर पडण्यात अनेक स्त्रिया यशस्वी झालेल्या आहेत. परंतु बहुतांश पुरुष मात्र त्यांच्या 'मर्दानी' मूल्यांच्या चौकटीतून अजूनही बाहेर पडू शकले नाहीत. ते 'पुरुषार्था'च्या, 'मर्दानगी'च्या चौकटीमध्ये अडकलेले आहेत.

स्वतःला 'असली मर्द' सिद्ध करण्याच्या स्पर्धेमध्ये आपले पुरुष प्रेम करणे, रडणे, हसणे, घाबरणे यांसारख्या सहज नैसर्गिक मानवी भावना सुद्धा दाबतात. जे पुरुष मर्दानगीच्या या व्याख्येत बसत नाहीत, त्यांना हा समाज वाळीत टाकतो व त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो. पुरुषांना एखाद्या गोष्टीचे वाईट वाटू शकत नाही का? त्यांनाही दुःख होत नसेल का? रडावेसे वाटत नसेल का? नक्कीच वाटत असेल. पण पुरुषांना त्यांच्या या भावना व्यक्त करण्याची मुभा दिली जात नाही. असे का? 'मला हे येत नाही', 'मला तिकडे जाण्याची भीती वाटते' असं ते म्हणूच शकत नाही. त्यांच्यावर पुरुषी दिसण्याचं आणि वागण्याचं दडपण असते.




पुरुषांना एकशिंगी बनवलं जातं—पैसे कमावण्याचं मशीन. ना शिवणकाम, ना भरतकाम, ना स्वयंपाक, ना मुलांचा सांभाळ, ना आई-वडिलांचा सांभाळ. जास्त धोकादायक हे आहे की पितृसत्तेने पुरुषांना माणुसकीपासून खूप दूर नेलं आहे. कधी पुरुषांना रस्त्यातून जाताना मुलींच्या अंगावरून हात फिरवण्यात मजा वाटते, तर कधी सोळा वर्षांचा मुलगा म्हातारीवर बलात्कार करतो, तर कधी ते धर्माच्या/जातीच्या नावावर दुसऱ्या धर्माच्या/जातीच्या स्त्रियांवर बलात्कार करतात. अशावेळी ते आपल्या शरीराला हत्यार बनवतात—ही माणुसकी आहे का? जर अर्धी दुनिया माणुसकीपासून लांब असेल तर १०० कोटी स्त्रियांवर हिंसा होते यात आश्चर्य काय?

मर्दानगीने पुरुषांवर लादलेलं आणखी एक ओझं आहे कर्तबगारीचं. 'पुरुषांनी अयशस्वी होता कामा नये' असं ओझं कुटूंब, समाज नेहमी पुरुषांवर लादत असतो. त्याच्याखाली दबलेल्या अनेक पुरुषांना आज मन मोकळं करण्याची जागा नाही. भावना व्यक्त करण्याची सवय नाही. या दबलेल्या भावनांची अभिव्यक्ती कुठेतरी होणारच. असे पुरुष मग एकतर बायकोवर हिंसा करतात, व्यसनाधीन होतात किंवा मानसिक आजारांना बळी पडतात.

स्त्री-पुरुष असमानता हा केवळ स्त्रियांचा प्रश्न नसून तो दोघांचा आहे. १५० ते २०० वर्षांत स्त्रियांना हे समजलंय की पितृसत्ता धोकादायक आहे; पुरुषांना का नाही समजलं? व्यक्तिगत पातळीवर येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, मोहम्मद पैगंबर, पेरियार, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, महात्मा गांधी असे अनेकजण पितृसत्तेविरोधात लढले. पण स्वातंत्र्य, वारसाहक्क, कुलदीपक, वंश चालवणारा असे जे फायदे पितृसत्तेमुळे मिळतात ते जास्त महत्त्वाचे वाटत असल्यामुळे सामान्य पुरुषांनी पितृसत्तेविरोधात आवाज नाही उठवला.

पुरुष जेव्हा या अन्यायकारक पुरुषसत्ताक व्यवस्थेचा आणि त्यातील मर्दानगीच्या संकल्पनांचा विरोध करतील, तेव्हा स्त्रियांवरील अन्याय तर दूर होईलच पण ते स्वतः देखील पुरुषत्वाच्या चौकटीतून मुक्त होतील. त्यांचे बायकोशी, मुलांशी, मित्रमैत्रिणींशी असणारे नातेसंबंध तर सुधरतीलच पण त्यांचे तणावमय जीवन हलके होऊन ते जीवनाचा खऱ्या अर्थाने आनंद घेऊ शकतील. स्त्री आणि पुरुष दोघांनाही माणूसपणाकडे घेऊन जाणारे हे विचार आपण स्वतःही अंगीकारूया आणि इतरांपर्यंतही पोहोचवूया. माणूसपणाच्या वाटेवर चालणारे मित्र आणि या वाटेवर चालताना त्यांना हात देणाऱ्या मैत्रिणी बनूया.

स्त्री-पुरुषांचा स्वतःशी आणि एकमेकांशी संवाद वाढायला हवा यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. लिंगभाव समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्री विरुद्ध पुरुष असे नव्हे तर स्त्री आणि पुरुष या दोघांनी मिळून प्रयत्न करायला हवेत असं आम्हला प्रामाणिकपणे वाटते. स्त्री-पुरुष द्वैताच्या पलीकडे जाणारी पितृसत्तेविरुद्ध लढाई लढणं हे पुरुषांच्याही हिताचं आहे. ते दोघांनाही अंतिमतः माणूसपणाकडे नेणारं आहे. स्त्री-पुरुष दोघांनाही मानवमुक्तीकडे नेणारी ही प्रक्रिया सुरू करण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न. आपणही यात सामील होऊ शकता.

## अभिव्यक्ती

**संपर्क पत्ता:** अभिव्यक्ती, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४.

*या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ९ ते १२ या वेळेत अभिव्यक्तीची बैठक होते (महिलांसाठी). आणि दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते (सर्वांसाठी). आपलं स्वागत आहे.*

अलका – 9067003838, ऋषिकेश – 9423507864   www.lokayat.org.in   @lokayat
abhivyakti.pune   lokayat.india   lokayatpune   pune.abhivyakti@gmail.com

हे पत्रक अलका जोशी यांनी अभिव्यक्तीसाठी मंगळवार, दि. १८ जून २०१९ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.